**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**नागरिकांची सनद**

| विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल. | सेवा पुरविणारा अधिकारी /कर्मचारी व दुरध्वनी क्रमांक | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक. |
|---|---|---|---|
| १)प्राधिकरणाच्या अखत्यारित कार्यरत ९ विभागीय मंडळे जसे की, १)मुंबई मंडळ ,२) मुंबई झोपडपटटी सुधार मंडळ, ३)मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, ४)कोंकण मंडळ , ५)पुणे मंडळ, ६)औरंगाबाद मंडळ , ७)नाशिक मंडळ, ८)अमरावती मंडळ व ९) नागपूर मंडळ या मंडळाच्या कार्यक्षेत्रात प्रगती पथावर असलेल्या कामांच्या पाहणी करिता वार्षिक कार्यक्रम तयार करण्यात येतो. सदर पाहणी कार्यक्रम सक्षम अधिका-यांकडे सादर करुन मंजूर करण्यात येतो. मंजूर केलेल्या वार्षिक उदिदष्टांप्रमाणे मंडळनिहाय प्रगती पथावर असलेल्या कामांची पाहणी करण्यात येते. पाहणीच्या वेळी बांधकामात व बांधकामांशी निगडीत दस्तऐवजामधील आढळलेल्या त्रृटीची पुर्तता करण्याकरिता मंडळातील संबंधित अधिका-यांना निरिक्षण अहवाल निर्गमित करण्यात येतात.<br>२)या कामांव्यतिरिक्त केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियाना अंतर्गत बीएसयुपी / आयएचएसडीपी या योजने | आवश्यकतेनुसार तथा कामाच्या स्वरुपानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सेवा पुरविण्यात येतात.<br>**<u>अ) कार्यकारी अभियंता -१/द.व गु.नि.क./प्राधिकरण यांचे कार्यक्षेत्र.</u>**<br>१)मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.<br>२)कोंकण गृ.नि.व क्षे.वि.मंडळ.<br>३)मुंबई व कोंकण मंडळाच्या कार्यक्षेत्रात जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत कामांची पाहणी करुन निरिक्षण अहवाल निर्गमित करणे.<br>४)म्हाडा भवनातील प्रयोग शाळेत बांधकाम साहित्यांची चाचणी करुन , चाचणी अहवाल देणे.<br>५)उपरोक्त नमूद विभागीय मंडळा अंतर्गत वेळ प्रसंगी उदभवणा-या तक्रारी बाबत चौकशी करुन वरिष्ठ अधिका-यांकडे चौकशी अहवाल सादर करणे.<br>**<u>ब) कार्यकारी अभियंता -२/३ ,द.व गु.नि.क /प्राधिकरण यांचे कार्यक्षेत्र.</u>**<br>१)मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ<br>२)मुंबई झोपडपटटी सुधार मंडळ.<br>३)पुणे गृ.नि.व क्षे.वि.मंडळ. | कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक<br>६६४०५२११<br>६६४०५२१६<br>६६४०५२३४<br>**प्रयोगशाळेचे दुरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे.**<br>६६४०५०९५<br>६६४०५००९ | दुरध्वनी क्रमांक ६६४०५२११ |

| | | | |
|---|---|---|---|
| अंतर्गत येणा-या बांधकामांची व बांधकामांशी निगडीत दस्तऐवजाची पाहणी करण्यात येते व पाहणी अंती  आढळणा-या त्रृटीची पूर्तता करण्याकरिता  संबंधित म.न.पा./न.पा. / नगर परिषदांना निरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात येतात.<br>३)निर्गमित झालेल्या निरिक्षण अहवालांचे पुर्तता अहवाल संबंधिताकडून प्राप्त झाल्यानंतर यथायोग्य तपासणी करुन सक्षम स्तरावर उपस्थित शेरे बंद करणे.<br>४)या व्यतिरिक्त वेळप्रसंगी योजनांची अंमल बजावणी करतांना  उदभवणा-या तक्रारीची तपासणी करणे व त्यानुसार चौकशी अहवाल सक्षम अधिका-यांकडे पुढील निर्णयार्थ सादर करणे.<br>४)गृहनिर्माण भवन ( म्हाडा कार्यालय ) वांद्रे (पूर्व ),मुंबई-५१ या ठिकाणी तळमजल्यावर साहित्य चाचणी प्रयोग शाळेत इमारत बांधकामाशी संबंधित साहित्य यथायोग्य शुल्क आकारुन  चाचणी करुन अहवाल देणे | ४)नाशिक गृ.नि.व क्षे.वि.मंडळ<br>५)औरंगाबाद गृ.नि.व क्षे.वि.मंडळ<br>६) नागपूर गृ.नि.व क्षे.वि.मंडळ<br>७)पुणे,नाशिक ,औरंगाबाद, अमरावती   व नागपूर मंडळांच्या कार्यक्षेत्रात जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत बीएसयुपी / आयएचएसडीपी अंतर्गत कामांची पाहणी करुन निरीक्षण अहवाल सादर करणे.<br>८)उपरोक्त नमुद विभागीय  मंडळा अंतर्गत वेळप्रसंगी उदभवणा-या तक्रारी बाबत चौकशी करुन वरिष्ठ अधिका-यांकडे चौकशी अहवाल सादर करणे. | | |

उपमुख्य अभियंता,
दक्षता व गुण नियंत्रण कक्ष /प्राधिकरण.